# "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महिला सबलीकरणातील योगदानाचा अभ्यास"

**सौ वर्षा सूर्यकांत मस्के** सहाय्यक शिक्षिका उषाराजे हायस्कूल कोल्हापूर. Email - varshamaske7279@gmail.com

---

**प्रस्तावना :** युगप्रवर्तक, सामाजिक क्रांतीचे उद्गाते, थोर शिक्षणतज्ञ, अर्थतज्ञ, परराष्ट्रनीतीतज्ञ, भारतीय संविधानाचे जनक असणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना समाज परिवर्तनाचे अग्रप्रणेते म्हणून ओळखले जाते. दीनदुबळयांच्या वंचित पीडित घटकांसाठी आयुष्यभर झटणाऱ्या डॉ. बाबासाहेबांनी सर्व धर्मीय महिलांना त्यांच्या हक्काची, अधिकाराची जाणीव करून दिली. महिलांना त्यांच्या हक्कासाठी प्रेरित केले. महिला सक्षमीकरणासाठी, महिला विकासासाठी वाट मोकळी करून दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या तरतुदी संविधानात केल्या त्यामुळेच संपूर्ण महिला वर्गाला स्वतःचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी व्यासपीठ मिळाले.

भारतात पूर्वीपासून चालत आलेल्या समाज व्यवस्थेमुळे स्त्रियांवर जाचक बंधने लादण्यात आली होती. भारतामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळात शूद्रांना दिली जाणारी वागणूक आणि स्त्रियांना मिळणारी वागणूक यात फारसा फरक नव्हता. पुरुषप्रधान संस्कृतीमुळे समाजात स्त्रियांना स्वातंत्र्याचा हक्कच नाकारला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य हे संविधान निर्मिती व अस्पृश्यता निवारणापुरते मर्यादित नसून ते भारतातील समस्त महिलांना घटनेत केलेल्या तजवीजींमुळे महिला सबलीकरणाला बळकटी देणारे असे आहे. "एखाद्या समाजाची प्रगती मोजायची असेल तर त्या समाजातील महिलांच्या प्रगती वरुन ठरवावे", असे मत मांडणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय स्त्रियांच्या सबलीकरणसाठी केलेले कार्य मांडण्याचा प्रयत्न या शोधनिबंधातून केलेला आहे.

भारतामध्ये 1924 च्या दरम्यान स्त्रीमुक्तीच्या लढ्याला सुरुवात झाली. समाजातून पूर्वपार चालत आलेल्या मानवनिर्मित अनिष्ट प्रथा ज्या स्त्रियांच्या माथी लादण्यात आल्या होत्या त्याला समाज परिवर्तकांकडून कडाडून विरोध दर्शविला जात होता. परंतु जोपर्यंत या प्रथा, परंपरा स्वतः महिलांकडून झुगारल्या जाणार नाहीत तोपर्यंत या रूढी मुळासकट नष्ट होणार नाहीत याची जाणीव वेळोवेळी विविध प्रकारच्या परिषदांमधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर महिलांना करून देत होते. याचेच फलित म्हणजे 1927 मध्ये महाड येथे झालेल्या चवदार तळयाच्या सत्याग्रहात महिलांचा सहभाग हा लक्षणीय असा होता.

सन 1927 ते 1956 या कालखंडामध्ये अस्पृश्यांना माणूस म्हणून जगण्याचा हक्क मिळाला पाहिजे, दलित मुक्तीचा लढा हा पर्यायाने मानवतेचा लढा होता इतकेच नव्हे तर हा स्त्री मुक्तीचा लढा होता.

**स्त्रियांच्या शिक्षणासाठी प्रयत्न:**

शिक्षणाचा हक्क हा सर्वांसाठी आहे, त्यात स्त्री अथवा पुरुष असा भेदभाव होऊन चालणार नाही. एक स्त्री शिकली की तिचे संपूर्ण कुटुंब शिकेल आणि संपूर्ण कुटुंब शिकले तर समाज शिकेल ही भावना मनात ठेवून समाज उन्नतीसाठी स्त्री शिक्षण हे अत्यंत महत्त्वपूर्ण आहे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जाणले. दलित बांधवांच्या परिवर्तनासोबत त्यांनी आपल्या भगिनींच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. त्यांनी घेतलेल्या विविध प्रकारच्या सभांमध्ये, परिषदांमधून तसेच आपल्या लेखणीतून इतकेच नव्हे तर हिंदू कोड बिल आणि राज्यघटनेच्या माध्यमातून स्त्री - पुरुष समानतेचा पुरस्कार केला; स्त्री शिक्षणावर भर दिला. स्त्री शिक्षणाची कवाडे उघडली गेली होती पण आपल्या या भगिनींना उच्च शिक्षणासाठी घरापासून लांब राहून उच्च शिक्षणही घेता यावे या दूरदृष्टीतून मुंबई, औरंगाबाद, पंढरपूर अशा विविध ठिकाणी शिक्षण संस्था व वसतिगृहाची स्थापना केली. या संस्था स्थापन करण्यामागचा हेतू फक्त आणि फक्त स्त्री शिक्षण हाच होता.

डॉ. बाबासाहेबांनी त्यांच्या आयुष्यात विद्येला प्रथम स्थान होते. विद्ये शिवाय मानवाला शांतता नाही आणि माणुसकीही नाही. विद्या ही महासागरासारखी आहे आणि ती सर्वांनी प्राप्त केली पाहिजे म्हणूनच राज्यघटनेच्या १५ व्या कलमांमध्ये 'स्त्री पुरुष समानता' तसेच शिक्षण हे पुरुषांप्रमाणे स्त्रियांचाही हक्क आहे आणि तो तिला मिळालाच पाहिजे अशी तरतूद त्यांनी केली. स्वाभिमान, स्वावलंबन आणि आत्मोद्धार हा फक्त शिक्षणामुळेच निर्माण होतो म्हणून शिक्षण घेण्याच्या बाबतीत स्त्रियांनी मागे राहू नये. "तुमच्या साडीला पन्नास ठिगळे असली तरी चालतील पण ती स्वच्छ असली पाहिजे, ती स्वच्छ ठेवण्यासाठी काळजी घ्या. तुम्ही शिकला तरच समाज प्रगती साधेल. प्रथम तुम्ही शिक्षित व्हा आपल्या मुला-मुलींना शिकवा त्यामुळे देशाचा नव्हे तर तुमच्या अस्मितेचाही विकास होईल. "शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे जो प्राशन करेल तो गुरगुल्याशिवाय राहणार नाही", अशा प्रकारे आपल्या भाषणातून परिषदेसाठी उपस्थित महिलांना शिक्षणाचे महत्त्व ते पटवून देत असत.

डॉ. बाबासाहेबांच्या या उपदेशांमुळेच भारतातील स्त्रिया शिकण्यासाठी सरसावल्या 1924 साली माता जाईबाई चौधरी यांनी 'संत चोखामेळा' ही मुलींची शाळा काढली. अंजनाबाई देशभ्रतार यांनी आपल्या पतीच्या मदतीने मुलींसाठी वसतिगृह सुरू केले. शांताबाई दाणी यांनी राजकारणात प्रवेश करून स्त्री शिक्षणाच्या कार्याला गतिमान केले. डॉ. बाबासाहेबांनी अखिल भारतीय महिला परिषदा आयोजित केल्या त्यातून स्त्री शिक्षणावरच भर दिला.

**स्त्री उन्नतीसाठी हिंदू कोड बिल निर्मिती:**

भारतीय स्त्रिया ह्या पूर्वीपासूनच विविध रूढी परंपरा यात गुरफटलेल्या होत्या. या रूढी परंपरा मधून स्त्रियांना मुक्त करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 24 फेब्रुवारी, 1949 साली 'हिंदू कोड बिल' संसदेत मांडले. डॉ. बाबासाहेब प्रख्यात

कायदे पंडित होते त्याचबरोबर ते स्वतंत्र भारताचे कायदेमंत्री देखील होते. त्यांनी भारतातील सर्व जाती धर्माच्या स्त्रियांना समानतेची वागणूक मिळावी यासाठी तब्बल ४ वर्ष, १ महिना, २६ दिवस अथक परिश्रम घेऊन हिंदू कोड बिल तयार केले. या बिलानुसार भारतीय स्त्रियांना समान अधिकार मिळतील याचा फायदा सर्व जातीच्या महिला वर्गाला होईल तसेच स्त्रियांना दिल्या जाणाऱ्या अधिकारांचे संरक्षण देखील या बिलानुसार देण्यात आले.

हिंदू कोड बिलामध्ये केलेल्या तरतुदी पुढील प्रमाणे :-

१. स्त्रियांना समानतेचा अधिकार मिळावा.

२. स्त्रियांना घटस्फोट देण्याचा अधिकार तसेच विधवा व मुलींना संपत्तीमध्ये अधिकार असे अधिकार देण्यात आले.

हिंदू कोड बिल मध्ये जे अधिनियम तयार केले त्यामध्ये खालील बाबींचा समावेश होतो.

१. हिंदू विवाह अधिनियम
२. विशेष विवाह अधिनियम
३. दत्तक घेणे, दत्तक ग्रहण, अल्पायु संरक्षता अधिनियम
४. हिंदू वारसा अधिनियम
५. दुर्बल आणि साधनहीन कुटुंबातील सदस्य यांना भरण पोषण अधिनियम
६. अप्राप्त वय संरक्षण संबंधी अधिनियम
७. वारसदार अधिनियम
८. हिंदू विधवा पुनर्विवाह अधिकार अधिनियम

हिंदू कोड बिलातील सात घटक मंजूर करण्यात आले त्यामध्ये १. पोटगी मागण्याचा अधिकार २. विवाह विषयी अधिकार ३. घटस्फोटा संबंधी अधिकार यांचा समावेश होतो.

हिंदू कोड बिल तयार केल्यामुळे सनातने वर्गानी त्याला कडकडून विरोध केला पण डॉ. बाबासाहेबानी आणि काही स्त्री संघटनाने हिंदू कायद्यात सुधारणा करावी म्हणून प्रयत्न केले आणि 1977 मध्ये हिंदू कोड बिल चा कायदा लागू झाला.

**स्त्रियांच्या हितासाठी भारतात 20 कायदे करण्यात आले ते पुढील प्रमाणे**

१. स्त्री प्रतिबंधक कायदा-१८५६
२. हिंदू विधवा पुनर्विवाहोत्तोजक कायदा-१८५६
३. धर्मांतराचा पूर्वीचा कायदा रद्द करणारा कायदा -१८६६
४. भारतीय तलाक कायदा -१८६२
५. ख्रिस्ती विवाह कायदा -१८७२
६. विवाहित नारी संपत्ती संरक्षण कायदा -१९७४
७. लीगल प्रॅक्टिशनर वुमन्स ॲक्ट -१९२३
८. बालिका विवाह प्रतिबंधक (शारदा) कायदा-१९२६
९. हिंदू उत्तराधिकार अधिनियम (संशोधित) कायदा-१९२६
१०. पारसी विवाह आणि तलाक कायदा-१९३६
११. हिंदू नारी संपत्ती अधिकार कायदा-१९३६
१२. प्रसूती अवस्थेत मिळावयाचा हक्क यासंबंधीचा कायदा-१९४३
१३. हिंदू विजोड विवाह प्रतिबंधक कायदा-१९४६
१४. हिंदू विवाह वैधता कायदा-१९४६
१५. विशेष विवाह कायदा-१९५५
१६. हिंदू विवाह कायदा-१९५५
१७. हिंदू उत्तराधिकार कायदा-१९५६
१८. हिंदू दत्तक ग्रहण आणि निर्वाह कायदा-१९५६
१९. हिंदू दत्तग्रहण कायदा-१९५८
२०. वेश्यावृत्ति उन्मूलन कायदा-१९५८

या स्त्रियांच्या हितासाठी केलेल्या कायद्यांमुळे स्त्रियांना त्यांच्याशी संबंधित असलेल्या प्रत्येक क्षेत्रामध्ये स्वावलंबी होऊन सबल होण्यासाठी केलेल्या तरतुदीमुळेच प्रत्येक क्षेत्रात महिलाही आघाडीवर असल्याचे दिसून येते याचे सर्व श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना द्यावे लागेल.

स्त्रियांनी शिकावे; उच्च विद्या विभूषित व्हावे इतकेच नव्हे तर पुरुषांच्या खांद्याला खांद्या लावून सर्वच क्षेत्रात पुढे राहावे. पुरुषांप्रमाणे स्त्रियांनाही समानतेची वागणूक मिळावी, बुरसटलेल्या परंपरांना छेद देऊन स्त्रियांना माणुसकीने वागवावे यासाठी झटणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दूरदृष्टी बाळगणारेच होते. स्त्रियांना समाजात उंच मानेने जगता यावे यासाठी प्रयत्नशील असणाऱ्या बाबासाहेबांमुळेच सध्याच्या आधुनिक स्त्रीचे विश्व चूल आणि मूल इतके मर्यादित न राहता विविध क्षेत्रात ती स्वच्छंदपणे विहार करताना दिसत आहे.

**संदर्भसूची**

१. डॉ. विलास आढाव, महिला सबलीकरण, पुणे विद्यापीठ २००९.
२. डॉ. य. दी. फडके 'आंबेडकर चळवळ', श्री विद्या प्रकाशन, पुणे १९९०.
३. पुष्पा रोडे, ज. शं. आपटे, 'भारतातील महिला विकासाची वाटचाल', डायमंड पब्लिकेशन, पुणे २००८.
४. धनंजय कीर, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर', पॉप्युलर प्रकाशन, पुणे २०१४
५. मनोहर यशवंत, तत्वज्ञानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.
७. डॉ. सुनंदा अहिरे व डॉ. उषा साळुंखे, स्त्री अभ्यासाच्या दिशा, अथर्व पब्लिकेशन, २०१२.
८. देशपांडे नलावडे भाग्यश्री, महिला सक्षमीकरणामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान, दक्षता मासिक, एप्रिल, २०१२.
९. डॉ. डाहाट धनंजय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर भाषणे आणि विचार, स्त्री संकेत प्रकाशन, नागपूर २०११.